| | |
|---|---|
| | दाखल दिनांकः– ०७.०५.२०१४<br>नोंदणी दिनांकः– ०७.०५.२०१४<br>घोषीत दिनांकः– ०४.०८.२०२६<br>कालावधीः – १२ ०२ २८<br>वर्ष महिना दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर यांच्या न्यायालयात**
**{पिठासिन अधिकारी सौ.ए.एस. जरुदे}**

**नियमीत फौजदारी खटला क्र.६४/२०१४** **निशानी क्र.५१**
**CNR No.MHCH070003732014**

महाराष्ट्र सरकार
मार्फत पोलीस अधिकारी,
पोलीस ठाणे, भद्रावती ,
तह.भद्रावती, जि.चंद्रपूर **......सरकार पक्ष**

**––विरुध्द––**

०१) **निर्मलकुमार बकीम विश्वास,**
वय–६८ वर्षे, कामधंदा– नोकरी,

०२) **बिंदु निर्मल विश्वास,**
वय–६६ वर्षे, कामधंदा– घरकाम,

०३) **राजेश निर्मल विश्वास,**
वय–३४ वर्षे, कामधंदा–शिक्षण ,
सर्व रा. बंगाली कॅम्प, भद्रावती,
तह.भद्रावती, जि.चंद्रपूर **.....आरोपी**

**दोषारोप**– कलम ४२० सह कलम ३४ भा.दं.वि. अंतर्गत

सरकार तर्फे :– श्री.एस.आर.ठावरी, सहा. सरकारी वकील साहेब.
आरोपींतर्फे :– श्री.पी.पी.ताठे,वकील साहेब.

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | **दिनांक ०३/०२/२००८ ते दि.०५/०८/२०१३** |

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | **दिनांक ०५/०८/२०१३** |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | **दिनांक ०७/०५/२०१४** |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge/Particular) | **दिनांक ०५/०९/२०२४** |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक (Date of commencement of Evidence) | **दिनांक २५/०५/२०२६** |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक (Date on which Judgment is reserved) | **दिनांक ०४/०८/२०२६** |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of Judgment) | **दिनांक ०४/०८/२०२६** |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | **----** |

| अ.क्र. (Rank of the accused) | गैरअर्जदारांची नांवे (Name of the Non-applicants) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानीतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentenced imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे (Period of detention undergone during trial for the purpose of Section 428 of Cr.P.C.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **निर्मलकुमार बकीम विश्वास** | --- | १४/०८/२०१३ | भा.दं.वि. चे कलम ४२० सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता. | --- | ---- |
| २. | **बिंदु निर्मल विश्वास** | --- | १४/०८/२०१३ | भा.दं.वि. चे कलम ४२० सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता. | --- | ---- |
| ३. | **राजेश निर्मल विश्वास** | --- | १४/०८/२०१३ | भा.दं.वि. चे कलम ४२० सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता. | --- | ---- |

## सूची–I
## अर्जदार/गैरअर्जदार/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.०१ **नि.क्र.३८** | **जंगलु फकरुजी दाते** | साक्षदार |

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.०२ **नि.क्र.४२** | **नवनाथ गणपतराव बुचे** | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ––– | **–––** | ––– |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –––– | –––– | –––– |

**अर्जदार/गैरअर्जदार/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | **४३** | न्यायालयाने ठाणेदार यांना प्रकरणातील एफ.आय.आर. दाखल करण्याबाबत दिलेले पत्र |
| ०२ | **४४** | प्रथम छापील खबर अहवाल |
| ०३ | **४५** | सा.क्र.१ जंगलु फकरु दाते यांचे बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ यामधील मजकुर |

**ब. बचाव पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ––– | **–––** | ––– |

**क. न्यायालय –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –––– | –––– | –––– |

**ड. मुद्देमाल –**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ––– | ––– | **–––** |

## न्यायनिर्णय
## (पारीत दिनांक ४ ऑगस्ट, २०२६)

आरोपींना कलम ४२० सह कलम ३४ भारतीय दंड विधान खाली दोषारोपीत करण्यात आले आहे. **(यापुढे 'भा.दं.वि.' असे संबोधण्यात येईल.)**

प्रकरणातील घटनेची थोडक्यात हकीकत अशी आहे की,

०२. फिर्यादी रामदास शंकर बावणे हे ओ.एफ. चांदा येथे नोकरीवर असतांना आरोपी क्र.१ सुध्दा तेथे कार्यरत असल्यामुळे दोघात ओळख झाली. सन–२००८ मध्ये ओ.एफ. चांदा येथे लेबरच्या जागा निघाल्या असल्याने आरोपी क्र.१ याने फिर्यादीस लेबरच्या जागा निघाल्या आहेत, तुमच्या मुलाला नोकरी लावून देतो, त्यासाठी रु.४ लाख द्यावे लागेल, असे आमिष दाखविले. त्यावेळी फिर्यादीने आरोपींना रु.१ लाख त्यांचे घरी जावून दिले. त्यावेळी सर्व आरोपी तेथे हजर होते. फिर्यादीच्या मुलाला नोकरी नोकरी लागली नाही. त्यामुळे दिलेले रु.१ लाख परत मागितले असता आरोपी क्र.१ याने फिर्यादीस पैसे परत केले नाहीत. फिर्यादीची फसवणूक केल्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशनला येवून रिपोर्ट दिली.

०३. सदर फिर्याद वरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्र.एम–२/२०१३, कलम ४२० सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये दाखल करण्यात आला.

०४. पो.हवा. नवनाथ गणपत बुचे यांनी तपासाच्या अनुषंगाने आरोपींचे बयाण, साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती आरोपीं विरुध्द कलम ४२० सह कलम ३४ भा.दं.वि. खाली शिक्षापात्र अपराधाकरीता दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०५. आरोपीं विरुध्द निशाणी क्र.**१८** वर कलम ४२० सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये शिक्षापात्र अपराधाकरीता दोषारोप निश्चीत केले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले. त्यावर आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांचेवर फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली.

०६. अभिलेखावर उपलब्ध पुरावा बघता माझे समक्ष निर्णयासाठी उपस्थित मुद्दे व त्यावरील माझा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.०३/०२/२००८ ते दि.०५/०८/२०१३, भद्रावती टप्पा, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर येथे आरोपी क्र.१ ते ३ यांनी संगणमतकरुन फिर्यादीच्या मुलाला ओ.एफ.चांदा येथे नोकरी लावुन देतो, असे म्हणून स्वतःच्या फायद्याकरीता फिर्यादीकडे पैशांची मागणी करुन एकुण रु.१,००,००/– ची फसवणुक केली आणि अशाप्रकारे **कलम ४२० सह कलम ३४ भा.दं.वि.** अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | **सिध्द केले नाही.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

०७. अभियोग पक्षाने आरोपीं वरील गुन्हा सिध्द करण्याकामी एकुण २ साक्षीदार तपासले आहेत. त्यापैकी साक्षीदार क्र.१ **जंगलु फकरुजी दाते** यांना साक्षदार म्हणून नि.क्र.३८ वर, साक्षीदार क्र.२ **नवनाथ गणपतराव बुच्चे** यांना तपास अधिकारी म्हणून नि.क्र.४२ वर तपासले आहे. त्यानंतर सरकारपक्षातर्फे पुरावा बंद करण्यात आला. प्रकरणातील फिर्यादी रामदास शंकर बावणे हे नि.क्र.३६ वरील मृत्यूप्रमाणपत्रा प्रमाणे मृत आहे. साक्षदार अनिल रामचंद्र दिवसे हे नि.क्र.२८ वरील अदम तामील रिपोर्टनुसार मरण पावले आहेत. अदम तामिल रिपोर्ट नि.क्र.३३ नुसार साक्षदार मनोहर गणपत मसादे यांना अन्ननलिकेचा कॅन्सर होवुन त्यांची तब्येत ठिक नसल्याने त्यांचे चालणे,फिरणे बोलणे बंद असल्याबाबत अभिलेखावर तसा रिपोर्ट असल्यामुळे त्यांना तपासण्यात आले नाही.

०८. आरोपींचे बयाण कलम ३१३ फौजदारी प्रक्रीया संहिता अन्वये **नि.क्र.४७ ते ४९ वर** नोंदविण्यात आले.

### <u>मुद्दे क्र.१ व २ करीताः–</u>

०९. अभियोग पक्षातर्फे तपासलेले सा.क्र.१ जंगलु फकरुजी दाते यांना साक्षीदार म्हणून तपासले असता त्यांनी आरोपींना ओळखत नसल्याचे तसेच फिर्यादीला देखील ओळखत नसल्याचे व घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे कथन केले. सरकारपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासादरम्यान त्यांनी आरोपी क्र.१ ने

फॅक्ट्रीमध्ये मजुरांच्या जागा निघाल्या आहेत, त्यांचे साहेबांसोबत संबंध आहेत, मुलाला नोकरी लावून देतो व त्याकरीता रु.१ लाख द्यावे लागतील, असे म्हंटल्याचे नाकारले. तसेच ८ दिवसांनी रु.१ लाख दिल्याचे व त्याचे मुलाला नोकरी न लागल्यामुळे पैसे परत मागितल्याचे व त्याअनुषंगाने पैसे परत देतो असे स्टॅम्पपेपरवर लिहून घेतल्याचे व त्याने ते पैसे परत केले नाही व फसवणूक केल्याचे नाकारले.

१०. सा.क्र.२ नवनाथ बुच्चे यांना तपासी अधिकारी म्हणून तपासले असता त्यांनी वरिष्ठांच्या आदेशान्वये अपराध क्र.एम२/२०१३ असा गुन्हा नोंदविल्याचे व ते पत्र नि.क्र.४३ वर तसेच प्रथम छापील खबर अहवाल नि.क्र.४४ वर सिध्द केला. तसेच त्यांनी साक्षीदार जंगलु फकरुजी दाते यांच्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ नि.क्र.४५ वर सिध्द केले. उलट तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ व जप्तीची कार्यवाही केली नसल्याचे नाकारले परंतु त्याअनुषंगाने कुठलेही दस्त नसल्याचे कारण सांगु शकत नसल्याचे कथन केले.

११. आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्याकामी प्रथम आरोपींनी संगणमताने फिर्यादीच्या मुलाला नोकरी लावून देतो असे म्हणून रु.१ लाखाची त्यांच्याकडे मागणी केली ही बाब सिध्द होणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने अभिलेखावर तपासण्यात आलेले सा.क्र.१ यांना साक्षीदार म्हणून तपासले असता त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही व आरोपींविरुध्द व घटनेबाबत पुराव्यादरम्यान काहीही कथन केले नाही. फिर्यादीला आरोपींनी मुलाला नोकरी लावण्याकरीता पैशाची मागणी केल्याचे तसेच त्याने आरोपीस रु.१ लाख दिल्याचे साधा उल्लेख देखील केला नाही. सदरचे प्रकरणात फिर्यादी हे मयत असल्यामुळे त्यांना तपासण्यात आले नाही. तसेच इतर साक्षीदार यांच्यापैकी साक्षदार नामे मनोहर मसादे यांना कॅन्सर आजार असल्यामुळे बोलता येत नसल्यामुळे सरकारपक्ष त्यांना तपासू शकले नाही व उर्वरीत साक्षीदार अनिल दिवसे हा मयत असल्यामुळे त्याला देखील प्रकरणात तपासण्यात आले नाही.

१२. प्रकरणात तपासण्यात आलेले तपासी अधिकारी यांनी पुराव्यादरम्यान फिर्याद दाखल करण्याचे पत्र व छापील प्रथम खबर अहवाल सिध्द केला व साक्षीदारांचे बयाण नोदविल्याचे देखील कथन केले. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे सदर प्रकरणात सा.क्र.१ यांनी आरोपींविरुध्द काहीही कथन केले नाही व उर्वरीत साक्षीदारांची साक्ष

अभिलेखावर नाही. तसेच तपासी अधिकारी यांनी उलट तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा किंवा जप्तीची कार्यवाही केली नसल्याची बाब नाकारली परंतु त्याअनुषंगाने कुठलेही दस्त अभिलेखावर सादर करु शकत नसल्याचे देखील कथन केले. तसेच अभिलेखावर घटनास्थळ पंचनामा देखील नाही. परिणामी, त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पुंचनामा केला नाही किंवा काहीही जप्त केले नाही. परिणामी त्यांची साक्ष ही केवळ छापील प्रथम खबर अहवाल नोंदविणे तसेच साक्षीदारांचे बयाण नोंदविणे या मर्यादिपर्यंत सिमीत असल्याचे सिध्द होते. परिणामी, आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याकरीता कुठलाही कागदोपत्री किंवा तोंडी पुरावा अभिलेखावर अभियोग पक्ष सादर करु शकला नाही. करीता, मी **मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी** देते व **मुद्दा क्र.२** करीता खालील प्रमाणे आदेश पारित करते–

## आदेश

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी क्र.१ **निर्मलकुमार बकीम विश्वास,** आरोपी क्र.२ **बिंदु निर्मल विश्वास व** आरोपी क्र.३ **राजेश निर्मल विश्वास,** सर्व रा. बंगाली कॅम्प, भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर यांची कलम ४२० सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये शिक्षापात्र अपराधातून, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी **प्रत्येकी** रक्कम रू.१५,०००/–चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा. |
| ३. | न्यायनिर्णय आरोपीं, आरोपींचे वकील आणि सरकारी वकील यांच्या समक्ष घोषीत. |

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.08.04 18:52:16 +0530

ठिकाणः भद्रावती

**(ए.एस. जरुदे)**

दिनांकः– ०४.०८.२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर